PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 3, ISSUE 2

# राजमाता जिजाबाईचे न्यायविशयक धोरण : एक अध्ययन

**प्रा. डॉ. चंद्रशेखर क्षिरसागर**
इतिहास विभागप्रमुख,
राणी लक्ष्मीबाई महिला महाविद्यालय
सावरगांव, जि. नागपूर
**महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना :

सतराव्या शतकात महाराष्ट्रामध्ये शिवाजीमहाराजांच्या नेतृत्वात हिंदवी स्वराज्य उदयास आले. त्यामागील ख–या प्रेरणाशक्ती शिवाजीमहाराजांच्या माता जिजाबाई होत्या. मातेच्याच संस्कारक्षमतेतुन शिवाजीमहाराजांचे व्यक्तिमत्व घडले. जिजाबाई केवळ जन्मदात्याच नव्हे तर स्वराज्याच्या प्रेरक शक्ती आहे. स्वातंत्र्यासाठी शहाजीराजे सारखे धडपड करीत असतांना त्यांना अपेक्षीत यश मिळत नव्हते म्हणूनच त्यांचे स्वतंत्र राज्य निर्मितीचे स्वप्न जिजाबाईने शिवाजीमहाराजांच्या माध्यमाने पूर्ण केले.

स्वराज्याची निर्मिती करतांना जिजाबाईने लोककल्याणकारी प्रशासकीय यंत्रणा राबवून प्रजेची निष्ठा संपादन केली. जिजाबाईमध्ये परिस्थितीनुरूप निर्णय घेण्याची क्षमता होती. त्या शिवाजीमहाराजांच्या अनुपस्थितीतही स्वराज्याचा कारभार उत्कृष्ठरित्या सांभाळीत असे. प्रशासनामध्ये जिजाबाईचा निर्णय महत्वपूर्ण मानला जाई. त्यांच्या कर्तृत्वाला मराठयांच्या इतिहासात तोड नाही. प्रस्तुत शोधनिबंधात जिजाबाईच्या न्यायविषयक धोरणाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

## जिजाबाईचे न्यायविशयक धोरण :

जिजाबाई ही सर्वसामान्य स्त्रियांप्रमाणे चुल आणि मूल यामध्ये धन्यता मानणारी सामान्य स्त्री नव्हती. देवगिरीच्या यादव राजघरण्याचा वारसा लाभलेल्या लखुजी जाधव या पराक्रमी पुरूषाची ती शुर कन्या होती, तर उदयपुरच्या राजघराण्यातील शहाजीराजे भोसले या पराक्रमी पुरूषाची ती वीर पत्नी होती. जाधव आणि भोसले या दोन्ही क्षत्रिय घराण्याचे संस्कार जिजाबाईवर झालेले होते. शहाजीराजे इ.स. 1636 मध्ये कर्नाटकात गेल्यावर त्यांनी पुणे जहागिरीच्या कारभाराची संपूर्ण जबाबदारी जिजाबाईवर सोपविली.[1] शहाजीराजांना जिजाबाईच्या कर्तृत्वाची पूर्ण जाणीव होती. जिजाबाई स्वराज्यातील न्यायनिवाडा करण्याकरीता बरेचदा सदरेवर बसे. त्या प्रजेच्या अडीअडचणी व तक्रारी ऐकुन घेत व त्यावर योग्य तो निर्णय देत असे. शहाजीराजांतर्फे त्या जहागिरीतील पत्रे काढीत. [2] जिजाबाईच्या शिस्तीबाबत प्रजेच्या मनात आदर होता. जहागिरीचा कारभार पाहण्याकरीता जिजाबाईकडे फारसी शिक्का होता. त्याचा आकार कुयरीसारखा असून लांबी 6/8 इंच तर रूंदी 1/2 इंच होती. [3] जिजाबाईच्या शिक्क्यावंर ''जिजाआऊ वालिदा इ राजा सीवाजी'' असा मजकुर होता. [4] जिजाबाईच्या कारभारासंबधीत सर्व पत्रांवर अशाप्रकारचा शिक्का आढळुन येतो. जिजाबाई हि एकमेव राज्यकर्ती स्त्री आहे की, जिच्या पत्रांवर फारसीमध्ये मोहोर उठविलेली दिसते. त्यापूर्वी कोणत्याही राज्यकर्त्या स्त्रीच्या पत्रांवर शिक्का असल्याचे आढळुन येत नाही. [5] जिजाबाईने स्वराज्यातील वतने , इनामे, पाटील–कुलकर्णीपणाचे बखेडे सोडवून कायदयाचे बाबतीत शिस्त निर्माण केली.

## जिजाबाईकडुन दादोजी कोंडदेवाच्या निर्णयाचा अव्हेर :

स्वराज्याची बांधणी करित असतांना गरिब – श्रीमंत, लहान – मोठा असा कुठलाही भेदभाव न करता सर्वांनाच समान न्याय मिळावा असे जिजाबाईचे धोरण होते. स्वराज्यातील कुणावरही अन्याय झाला तर ती व्यक्ती थेट आपली गा–हानी जिजाबाईकडे मांडीत असे. सर्व बाबींची सखोल चौकशी केल्यानंतर आपल्या अधिका–यांची दिलेले निर्णय चुकीचे आढळुन आल्यास ते निर्णय डालवून जिजाबाई योग्य बाजुने निर्णय देत.

लुखो विठ्ठल हा शिरवळ परगण्याचा देशकुलकर्णी होता. त्याला कान्होपंत व पुरूषोत्तमपंत असे दोन पुत्र होते. लुखो विठ्ठलाने आपला जेष्ठ पुत्र कान्होपंत यास

परगण्याचे देशकुलकर्णी व गावकुलकर्णीपणाचे अधिकार दिले तर पुरूषोत्तमपंतास कसब्याच्या मुजेरी व मोहतर्फा यांच्या कुलकर्णीपणाचा अधिकार, घर, वाडा व संपत्ती दिली. कान्होपंतास रत्नाजी व विठ्ठलपंत तर पुरूषोत्तमपंतास तिमाजी व मुरार असे पुत्र होते. विठ्ठलपंताचा पुत्र रामाजी आणि पुरूषोत्तमपंताचा पुत्र तिमाजी हे दोघेही दादोजी कोंडदेवाकडे वतनाचे काम सांभाळीत. तेव्हा तिमाजीने दादोजी कोंडदेवाकडे वतनाचा परंपरागत वाद तिस–या पीढीचे काळात उपस्थित केला. त्यावेळी दादोजी कोंडदेवाने पूर्वीची वाटणी रद्द करून देशकुलकर्णीपणाचे वतन रामाजी व तिमाजी या दोघांना सारखे वाटुन दिले. [6] त्यांच्या निर्णयामुळे तिमाजीचा फायदा झाला परंतु रामाजीच्या मनात आपल्यावर अन्याय झाल्याची खंत घर करून बसली. तेव्हा दादोजीच्या न्यायदानावर असंतुष्ट होऊन रामाजीने पुण्यास जिजाबाईच्या भेटीला जाऊन आपला निवाडा गोतसभेत करण्याची मागणी केली. जिजाबाईला त्याची मागणी न्याय्य वाटली. त्यांनी लागलीच दादोजी कोंडदेवाचा निर्णय रद्द केला व पुन्हा गोतसभेत निवाडा करण्याचा आदेश दिला. लगेच दादोजीने शिरवळ परगण्याच्या हवालदारास पत्र पाठवून देशमुख, पाटील व वतनदार यांचेसमोर रामाजी व तिमाजी यांचा निवाडा गोतसभेत करावा अशी सुचना केली. [7] त्यांचेतील निवाडा गोतसभेत करून जिजाबाईने रामाजीला न्याय मिळवुन दिला.

## गणो गबाजीचे इनाम परत :

गणो गबाजी तबीब यास पुणे परगण्यातील वेहरवडे येथील जमीन शहाजीराजेंनी इनाम दिली होती. परंतु पुढे शिवाजीमहाराजांनी इनामे अनामत करावी असे फर्मान काढल्याने वेहरवडे गावातील मोकद्दमाने गणो गबाजीचे इनाम अनामत केले. त्यामुळे सरळ तो जिजाबाईकडे दाद मागण्याकरीता आला. जिजाबाईने गणो गबाजीची तक्रार ऐकुण घेतल्यानंतर त्याची बाजु न्याय्य असल्याचे लक्षात येताच वेहरवडे गावाच्या मोकद्दमाला पत्र पाठवुन गणो गबाजीकडे पुर्वी जसे इनाम चालत होते, तसेच पुढेही चालुच ठेवावे आणि 'चिरंजीव राजश्री सिऊबाचे खुर्दखताची' मागणी करू नये असा आदेश दिला.[8] त्यानुसार गणो गबाजीला त्याचे इनाम परत मिळाले. यावेळी जिजाबाईने खुद्द शिवाजीमहाराजांचा निर्णय फिरविला. यावरून जिजाबाईची न्यायनिष्ठुरता किती श्रेष्ठ दर्जाची होती हे लक्षात

येते. शिवाजीमहाराजांनीही आपल्या मातोश्रीच्या निर्णयाचा सन्मान करून गणो गबाजीचे इनाम पुर्ववत सुरू ठेवावे अशी ताकिद वेहरवडे गावाच्या मोकद्दमाला दिली. [9] यावरून स्वराज्याच्या न्यायविषयक क्षेत्रात जिजाबाईचा निर्णय अंतीम असल्याचे लक्षात येते.

## गुरवपणाचा निवाडा :

ग्रामदेवतेची पुजाअर्चा, देवाला पोषाख, दागिणे घालण्याचे काम गुरवाला करावे लागे. ही कामे तो बलुत्याच्या मोबदल्यात करित असे. जेजुरी येथील मार्तंड भैरवाच्या मंदिरातील गुरवणासंबधी परसदरणा व सतोवा गुरव हयांचेत वाद सुरू होता. ते भांडण जिजाबाईकडे आले, तेव्हा चौकशीअंती जिजाबाईने परसदरणा यास जेजुरीच्या मार्तंड भैरवाच्या मंदिरातील गुरवपणाचे अधिकार दिले. [10] व परसदरणा आणि सतोवा हयांचेतील भांडणाचा निवाडा करूण दिला.

## सुलतानजी जगदाळेच्या पुत्राला कौल :

मसुरचा देशमुख सुलतानजी जगदाळे याने अफजलखानाशी हातमिळवणी केल्यामुळे शिवाजीमहाराजांनी त्याची गर्दन उडविली. त्याची पत्नी व अल्पवयीन पुत्र महादजी जीव वाचविण्यासाठी पळुन गेले. कालांतराने सुलतानजीची पत्नी राजगडावर मातोश्री जिजाबाईकडे येवुन तीने सर्व वृत्तांत कथन करून पुत्र महादजीस कौल देण्याची विनंती केली. शिवाजीमहाराजांना सुलतानजीच्या पुत्रास मसुरची देशमुखी दयायची नव्हती. अशावेळी जिजाबाईने शिवाजीमहाराजांना महादजीस मसुरची पाटीलकी देण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे महादजीला मसुरची पाटीलकी मिळाली.[11] अशाप्रकारे जिजाबाईने सुलतानजी जगदाळेच्या असहाय्य विधवेला व पुत्राला कौल मिळवुन दिला.

## जिजाबाई गोतसभेच्या अध्यक्षपदी :

कानदखो—याचे बाबाजी झुंजारराव व मालोजी पतंगराव या बंधुमध्ये वतनासाठी आपसात भांडणे सुरू होते. 24 जानेवारी 1667 रोजी कानदखोरे या मावळ प्रांतातील धानीब गावी एक गोतसभा भरवण्यात येवुन त्या गोतसभेचे अध्यक्षपद जिजाबाईने भुषविले. त्यावेळी बाबाजी झुंजारराव व मालोजी पतंगरराव यांचेतील वाद निकाली काढण्यात आला, त्याप्रमाणे वतनाची वाटणी करण्यात येवून मालोजी पतंगरावांना बाबाजी झुंजाररावाकडुन त्यांच्या

वतनाचा 1/4 हिस्सा जास्तीचा देण्यात आला. [12] सर्वांनी हा निर्णय मान्य केला. यावरून मातोश्री जिजाबाईच्या न्यायक्षेत्रातील अधिकाराची प्रचीती येते.

## विठोजी हैबतरावाला कौल :

गुंजनमावळचा देशमुख विठोजी हैबतराव सिलींबकर हा अफजलखानाला सामील होऊन त्याने स्वराज्याशी बईमानी केली. अफजलखानाच्या वधानंतर त्याची स्थिती मात्र दयनिय बनली. त्यामुळे आपला जीव वाचविण्यासाठी तो वणवण भटकु लागला. अखेर हतबल होऊन त्याने शिवाजीमहाराजांकडे अभयाचा कौल मागितला व आजपर्यंत केलेल्या कृत्याबद्दल पश्चाताप व्यक्त केला. स्वराज्य रक्षणासाठी कर्तबगार व्यक्तींची जिजाबाईला आवश्यकता वाटत होती. त्यामुळे शरणागताला आश्रय देवून त्यांच्या पराक्रमाचा वापर स्वराज्याच्या कार्यात करून घेणे ही काळाची गरज होती. म्हणूनच जिजाबाईने विठोजी हैबतरावाला धीर देवून स्वराज्यात परत येण्यास सांगीतले. 4 एप्रिल 1668 रोजी जिजाबाईने विठोजी हैबतरावाला 'तुम्ही सुखे आपली देशगती चालवणे, आमच्या तर्फेने तुमचे वाईट सर्वथा होणार नाही' असे आश्वासन दिले.[13] अशाप्रकारे विठोजी हैबतरावासारख्या जुन्या गुन्हेगारांना माफ करून जिजाबाईने त्यांना पुन्हा स्वराज्याच्या कार्यात सामील करून घेतले.

## बाबाजीराम व मुकूंद कान्हो हयांचेतील वादाचा निवाडा :

पुणे परगण्यातील बाबाजीराम व मुकूंद कान्हो या बंधुमध्ये परगण्याच्या देशकुलकर्णीपणाचे वतनासंबधी भांडण सुरू होते. बाबाजीराम हा मुकूंद कान्होचा अधिकार डावलुन स्वतः आपणच परगण्याच्या वतनाचा उपभोग घेवू लागला. त्याविषयी मुकूंद कान्हो याने जिजाबाईकडे तक्रार केली. तेव्हा जिजाबाईने या दोन बंधुमधील भांडणाची चौकशी केली, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की बाबाजीराम हा मुकूंद कान्होवर अन्याय करतो.या भांडणाचा निर्णय देतांना 28 डिसेंबर 1668 रोजी जिजाबाईने बाबाजीराम यास ताकीद दिली की 'मुकुंद कान्होच्या वतनाच्या कारभाराचे अधिकार तुम्ही हिरावून घेतले, यापुढे त्याचा कारभार त्याला करू द्यावा व पुर्वी जसा कारभार चालत होता त्यापद्र्माणे यापुढेही चालवावा' [14]असा निर्णय देवुन जिजाबाईने मुकूंद कान्हो यास न्याय मिळवून दिला.

## चेपगीर गोसावीस इनाम :

प्रा. डॉ. चंद्रशेखर क्षिरसागर

जावळी सुभ्यातील हुमगाव येथे चेपगीर गोसावीस इनाम म्हणून काही झाडे मिळाली होती. परंतु मध्यंतरीच्या काळात त्यांच्या इनामामध्ये खंड पडला. तेव्हा जिजाबाईच्या निदर्शनास ही बाब येताच त्यांनी जावळी सुभ्याचे सुभेदार विठ्ठल दत्तो यांना आदेश देवुन चेपगीर गोसावीचे इनाम पुर्वीप्रमाणेच पुढेही चालु ठेवण्याबाबत आदेश दिला.[15]

## रंगभट ठकारच्या मिरासीचा निर्णय :

मावळ प्रदेशातील देहकर्याती येथील कुलकर्णी रंगभट ठकार जोशीच्या कुटुंबाला कोढे, अइरे, सिवणे व कोपरे या चार गावातील भटपणाची मिरासी परंपरागत चालू होती. त्याचा कारभार रंगभट ठकार जोशी चालवित असे. परंतु दुष्काळ पडल्यामूळे रंगभटाला देशांतर करावे लागले. त्यामुळे त्याची माता गिरिजाई व पत्नी जानकी निराश्रीत झाल्या. अशावेळी त्यांना पुणे येथील विनायक भटाने आश्रय देवुन त्यांचे पालणपोषण केले. म्हणून गिरजाईने संपूर्ण मिरासी विनायक भटाला लावून दिली. कालांतराने गिरजाई व विनायक भटाचे निधन झाले. तेव्हा नागेशभट ठकार या व्यक्तीने ती मिरासी आपलीच असल्याचा दावा केला.तसेच अइरे गावाची कुलकर्णीपणा चालवित असलेल्या शंकराजी भोवर पाचकुंडवी यानेही अइरे येथील कुलकर्णीपणा आपल्याला दाणात मिळाली असल्याचा दावा केला. अशावेळी बुदपाचेगाव येथे जानकी, नागेशभट ठकार व शंकराजी भोवर यांचेतील भांडणाचा निवाडा करण्यात आला. तेव्हा नागेशभट ठकार खोटा ठरला. तर शंकराजी भोवरला मुतालीक म्हणून मान्यता देण्यात आली. त्यानंतरही हा वाद सुरूच राहिला. तेव्हा जिजाबाईसमोर हा वाद न्यायनिवाडासाठी ठेवण्यात आला. जानकीच्या सासुने विनायक भट ठकार यास संपूर्ण मिरासी दिलेली असल्याने व विनायक भटाने रंगभटाची माता व पत्नीचे पालण पोषण केल्यामूळे चारही गावाची जोशी व कुलकर्णीपणाची मिरासी विनायक भटाच्या पुत्रास देण्याचा जिजाबाईने निर्णय घेतला. आणि 10 नोव्हे. 1673 रोजी कर्जत मावळचे देशमुख व देशकुलकर्णी यांना सर्व मिरासी विनायकभटाचे पुत्रास देण्याचा आदेश दिला. [16] अशाप्रकारे बरेच दिवसापासुन चालत आलेल्या रंगभट ठकारच्या मिरासीचा निर्णय लावून जिजाबाईने विनायक भटाच्या कुटुंबाला त्यांचा हक्क मिळवून दिला. वयाच्या पंच्याहत्तराव्या वर्षातही स्वराज्याच्या कारभारात जिजाबाई उत्साहाने भाग घेत असल्याचे दिसुन येते.

## निष्कर्ष :

पुणे जहागिरीचा व स्वराज्याचा कारभार चालवितांना जिजाबाईने आदर्श प्रशासकिय यंत्रना राबविली. स्वच्छ न्यायदान, कडक प्रशासन, सर्वाना समान न्याय, प्रजावत्सलता या बाबी त्यांच्या प्रशासनात महत्वपूर्ण होत्या. जिजाबाईने स्वराज्यातील गुंडगिरी, व्यभिचार, अत्याचार, अन्याय मोडुन काढले व प्रजेमध्ये अन्यायाचा प्रतिकार करण्याची शक्ती निर्माण केली. स्वराज्याच्या कारभारातील न्यायविषयक क्षेत्रात जिजाबाईने केलेले कार्य उल्लेखनीय ठरते. त्या प्रत्येक तंटयांची सखोल चौकशी करून निर्णय देत. त्यांचा निर्णय स्वराज्यात अंतीम मानला जाई. त्यांच्या न्यायनिवाडयामुळेच आपल्यावरील अन्याय दूर होऊ शकतो. याची स्वराज्यातील प्रजेला जाणीव झाली. स्वराज्याला लोकांचे पाठबळ मिळाले व स्वराज्याचा वृक्ष अधिकच जोमाने बहरायला लागला. याचे सर्व श्रेय आपणास राजमाता जिजाबाईला द्यावे लागेल. अशा कर्तृत्वशालीनी राजमातेला मानाचा मुजरा !

## संदर्भग्रंथ सुची :

1. बाहेकर, डॉ.एस.ए. – राष्ट्रमाता जिजाऊ ( चिकित्सक चरित्र ), पृ. 121, कसब प्रकाशन जळगाव,प्रथमावृत्ती, 1998.
2. मूजुमदार, गं.ना. / कर्वे, चिं.ग. / जोशी, चिं.ब. (संपा.) – शिवचरित्र साहित्य खंड – 8, ले. 51, पृ. 57–58, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, प्रथमावृत्ती 1964.
3. केळकर, न.चि /आपटे, द.वि. – शिवाजीनिबंधावली भाग 2 , पृ. 93, श्रीशिवचरित्रकार्यालय पुणे, प्रथमावृत्ती, 1930.
4. राजवाडे, वि.का. (संपा.) – ऐतिहासीक प्रस्तावना, पृ. 446, चित्रशाळा प्रेस पुणे प्रथमावृत्ती 1928.
5. जोशी, शं.ना – अर्वाचीन महाराष्ट्रेतिहास कालांतील राज्यकारभाराचा अभ्यास भाग 1 पृ. 229 पुणे विद्यापीठ प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती 1959.
6. राजवाडे, वि.का. (संपा.) – मराठयांच्या इतिहासाची साधने खंड–20, ले. 53, शं.श्री. देव आत्माराम छापखाना धुळे, प्रथमावृत्ती 1915.

7. केळकर, न.चि /आपटे, द.वि. – शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड 1, ले 513, पृ. 111. श्री. शिवाजी रायगड स्मारक मंडळ पुणे , प्रथमावृत्ती 1930.
8. कुलकर्णी, डॉ. अनुराधा गोविंद (संपा.) – श्री शिवछत्रपतींची पत्रे खंड 1 पृ. 12–13 परममित्र पब्लीकेशन ठाणे, प्रथमावृत्ती 2001.
9. बेंद्रे, वा.सी. (संपा.) – महाराष्ट्रेतिहासाची साधने विभाग दुसरा, ले. 81, पृ. 85, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मुंबई, प्रथमावृत्ती 1966.
10. पुवौक्त, शिवकालीनपत्रसारसंग्रह – 1, ले. 641, पृ. 138.
11. राजवाडे, वि.का. (संपा.) – मराठयांच्या इतिहासाची साधने खंड– 15 , ले. 3, पृ. 16, शं.श्री. देव आत्माराम छापखाना धुळे, प्रथमावृत्ती 1912.
12. राजवाडे, वि.का. (संपा.) – मराठयांच्या इतिहासाची साधने खंड – 16 ले. 22 पृ. 37–39, तुकाराम जावजी निर्णय छापखाना धुळे, प्रथमावृत्ती 1913.
13. राजवाडे, वि.का. (संपा.) – मराठयांच्या इतिहासाची साधने खंड– 17 ले. 13, पृ. 33, भास्कर वामन भट आत्माराम छापखाना धुळे, प्रथमावृत्ती 1913.
14. राजवाडे, वि.का. (संपा.) – मराठयांच्या इतिहासाची साधने खंड– 18 ले. 11 पृ. 30–31, तुकाराम जावजी निर्णय छापखाना मुंबई, प्रथमावृत्ती 1914.
15. देशपांडे, डॉ.प्र.न. (संपा.) – मराठयांच्या इतिहासाची साधने खंड – 4 ले. 279, पृ. 410, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ धुळे प्रथमावृत्ती 2003.
16. केळकर, न.चि /आपटे, द.वि. – शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड 2, ले. 1591, पृ. 467. श्री. शिवाजी रायगड स्मारक मंडळ पुणे , प्रथमावृत्ती 1930.